लोकमत

# जपानी शिक्षक-विद्यार्थी उद्या शिवाजी विद्यापीठात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून विदेशी भाषा विभागामार्फत जपान येथील प्रतिनिधी मंडळ उद्या, दि. २८ फेब्रुवारी आणि १ मार्च या कालावधीत शिवाजी विद्यापीठाला भेट देणार आहेत.

विदेशी भाषा अधिविभागात जपानी भाषेचे प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रमाचाही समावेश होतो. जपानमधील क्योतो सेइका विद्यापीठातील तीन शिक्षक व आठ विद्यार्थ्यांचा गट विदेशी भाषा विभागाला भेट देणार आहे. ते या काळात कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्यासह इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. एस. बी. सादळे व इतर अधिकाऱ्यांची भेट घेतील. यावेळी क्योतो सेइका विद्यापीठाचे प्रतिनिधी दि. २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी जपानी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. यामध्ये एल. एस. प्रार्टनर्स कंपनी प्रा. लि.च्या व्यवस्थापकीय संचालक सायुरी मात्सुनो, टोकियो आणि क्योतो सेइका विद्यापीठाचे प्रतिनिधींचा समावेश आहे. दि. १ मार्च रोजी सकाळी ११.३० वा. वि. स. खांडेकर सभागृहात जपानी विद्यार्थी सांस्कृतिक कलांची ओळख करून देणार आहेत. सहभागी होण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या मेघा पानसरे यांनी केले आहे.

लोकमत

# विद्यापीठात उद्या 'राष्ट्रीय विज्ञान दिन'

कोल्हापूर : समाजात विज्ञानाविषयी जागरूकता निर्माण होऊन विज्ञानाची निरंतर प्रगती होण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये उद्या, दि. २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा होत आहे. यानिमित्त तंत्रज्ञान विभागात संशोधन, करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी तंत्रज्ञान विभागात संशोधन, करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रामधील शिक्षण, संशोधन, व रोजगार संधीबद्दल माहिती मिळणार आहे.

लोकमत

# कॉमर्स कॉलेजमध्ये संविधान जागृती सप्ताह

लोकमत न्यूज नेटवर्क

**कणेरी :** देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागृती निर्माण होण्यासाठी 'संविधान जागृती सप्ताह'चे आयोजन केले होते. या सात दिवसांत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये संविधान जागृती रॅली, व्याख्याने, ग्रंथप्रदर्शन, निबंध लेखन स्पर्धा, भित्तीपत्रक प्रदर्शन व वक्तृत्व स्पर्धा आदींचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी त्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचा पोलिस उपअधीक्षक तानाजी सावंत, उपप्राचार्य बी. टी. नाईक यांच्या हस्ते प्रा. डॉ. एस. एस. देसाई लिखित 'भारतीय संविधान का वाचावे? का वाचवावे' हे पुस्तक व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्ष रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, संचालक ॲड. वैभव पेडणेकर-वाडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे संयोजन डॉ. एस. एस. देसाई यांनी केले. बी. ए. कस्टमर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागामध्ये उद्या संशोधन, करिअर मार्गदर्शन कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त मंगळवारी (दि. २८) 'संशोधन व करिअर' मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्यासाठी व संशोधकांचे कार्य, अभियांत्रिकी क्षेत्राची माहिती पोहोचवून समाजात विज्ञान जागरूकता निर्माण होण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी विद्यार्थी, पालक, उद्योजक यांना विभागाला भेट देऊन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहे. याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रामधील शिक्षण, संशोधन व रोजगारसंधीबद्दल माहिती मिळणार आहे. अभियांत्रिकी क्षेत्रामधील माहिती व योग्य करिअर संधी निवडण्यासाठीचे मार्गदर्शन अधिविभागाचे संचालक व शाखा समन्वयक, प्राध्यापकांकडून मिळणार आहे.

पुढारी

# जपानी शिक्षक-विद्यार्थ्यांचा २८ पासून विद्यापीठ दौरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा अधिविभागास जपानमधील प्रतिनिधींचे मंडळ भेट देणार आहे. २८ फेब्रुवारी व १ मार्च या दोन दिवसीय दौऱ्यात विद्यार्थी संवाद, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

जपानमधील क्योतो सेईका विद्यापीठातील ३ शिक्षक व ८ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ते कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. एस. बी. सादळे व प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेतील. १ मार्च रोजी वि. स. खांडेकर सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागातर्फे डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

27 FEB 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी प्रमाण भाषा लेखन, संगणक वापरात येणार सुसूत्रता!

## राजभाषा विभागाकडून नियमावली जाहीर

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

**'लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी,**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी**
**आमुच्या मनामनात दंगते मराठी,**
**आमुच्या रगारगात रंगते मराठी'**

या पंक्तीतून कविवर्य कविवर्य सुरेश भट यांनी मराठी भाषेचे कौतुक केले आहे. मात्र, प्रमाणित मराठी भाषा लेखन व संगणकावर मराठी भाषा वापरताना आजही बऱ्याच चुका आहेत, त्यासाठी मराठी राजभाषा विभागाने पाऊल उचलले आहे. त्यानुसार सात परिशिष्टातून स्वरचिन्हे; जोडाक्षरे, वर्णक्रम, लेखनात वापरावयाची विरामचिन्हे अंक, अंकांचे अक्षरी लेखनाविषयी नियमावली दिली आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या लेखनात एकरूपता राखता येणार आहे.

दरवर्षी २७ फेब्रुवारी कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेतील स्वर, स्वरादी यांची संख्या, प्रमाणलेखनाबाबतचे नियम सोपे करण्याची मागणी काही शिक्षक, लेखकांनी केली होती. त्यानुसार देवनागरी लिपीतील प्रमाणीकृत मराठी वर्ण, अक्षरमालेचा व अंकांचा शासनाने स्वीकार केला आहे. त्या अनुषंगाने वर्णमालेच्या संदर्भातील स्पष्टीकरण, विशिष्ट अक्षरांच्या लेखनाबाबतच्या सूचना स्वरचिन्हे, जोडाक्षरे, वर्णक्रम, लेखनात वापरावयाची विरामचिन्हे व अन्य चिन्हे, अंक, अंकांचे अक्षरी लेखनाविषयी सोदाहरण सूचना देणारी सात परिशिष्टे मराठी राजभाषा विभागाच्या शासन निर्णयात दिली आहेत.



मराठी भाषा गौरव दिन

राज्य सरकारने स्वीकारलेल्या मराठी वर्णमालेत स्वर, स्वरादी, व्यंजने, विशेष संयुक्त व्यंजने तर मराठी लेखन- मुद्रणासाठी व संगणकीय क्षेत्रासाठी स्वरचिन्हे आणि स्वरेतर चिन्हांचा वापर केला जाणार आहे. वर्णमाले 'अॅ', ऑ यासह ऋव ऌ या ऱ्हस्वचा समावेश केला आहे. देवनागरी लिपीतील मराठी लेखनचिन्ह तक्त्यास वर्णमाला व अक्षरमाला असे म्हटले जाणार आहे. जोडाक्षरे, विरामचिन्हे व इतर चिन्हे, वर्णक्रम, देवनागरी अंक व त्यांचे प्रमाणीकृत अक्षरी लेखन याचबरोबर मराठी वर्णमाला तक्ता ही सर्वसाधारण वापरासाठी तर अक्षरमाला तक्ता शालेय स्तरावर वापरवा, अशा सूचना दिल्या आहेत.

> शासकीय व्यवहार आणि सार्वजनिक वापरात मराठी प्रमाण भाषा वापरण्याचे शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभागाने सुरू केले आहे. दैनंदिन वापर व पुस्तक छपाईत वापर केला जात आहे. युनिकोडचा वापर महाविद्यालय, अधिविभाग, प्रशासकीय विभागास मार्गदर्शन करण्याची भूमिका घेतली आहे. यासंदर्भात कार्यशाळांचे आयोजन केले जात आहे. यामुळे मराठी लेखनात सुसूत्रता येईल.
>
> **- प्रा. डॉ. नंदकुमार मोरे**, मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

### मराठी अधिविभाग संलग्न महाविद्यालयांना जोडण्याचा उपक्रम

विद्यापीठातील मराठी अधिविभाग संलग्न महाविद्यालयांना जोडण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लेखक संवाद, संग्रहालय आणि विद्यापीठ परिसर पाहण्यासाठीचा उपक्रम सुरू आहे. अधिविभागात १७५ हून पीएच.डी.धारक असून पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश फुल्ल झाले आहेत. राज्य शासन व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार विद्यार्थ्यांनी पटकावले आहेत.